**आदिम जमाती विकास कार्यक्रमांतर्गत Income generation activities या योजनेच्या मार्गदर्शक तत्वांना मंजूरी देणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः आदिम-२०१७/प्र.क्र.४१/का-१९**
मंत्रालय, मुंबई ४०००३२
तारीख: १६/१०/२०१७

<u>वाचा-</u>

१. जनजाती कार्य मंत्रालयाचे पत्र क्र. ११०२२/१८/२०१२-NGO(PTG), २३/१२/२०१७
२. आदिवासी विकास विभागाचा शासन निर्णय क्र. आदिम-२०१५/प्र.क्र.१९/का-१९, दि.३०/०३/२०१५

**<u>प्रस्तावना -</u>**

आदिम जमाती विकास कार्यक्रमांतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता केंद्र शासनाने रु. १९००.०० लक्ष निधीच्या एकुण ५ प्रस्तावांना वाचा क्र. १ वरील पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे. या योजनेअंर्तगत केंद्र शासनाने Income generation activities या योजनेच्या एकुण रु. ४००.०० प्रस्तावास मंजूरी प्रदान केली आहे. उपरोक्त योजनेकरीता वाचा क्र. २ वरील शासन निर्णयान्वये निधी आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांना वितरीत करण्यात आला आहे. आदिम जमाती विकास कार्यक्रमांतर्गत मंजूर Income generation activities योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे मार्फत करण्यासाठी मार्गदर्शक सूचनांना मंजूरी देण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-**

या निर्णयाद्वारे सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्रमांक १ नुसार महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांचे मार्फत राबविण्यात येणाऱ्या Income generation activities योजनेच्या एकुण रु .४००.०० लक्ष किंमतीच्या अंमलबजावणीच्या मार्गदर्शक सूचनांना मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

सदर मार्गदर्शक सूचनांनुसार वितरीत तरतूदींच्या मर्यादेत योजना राबविण्याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र आर्थिक व भौतिक अहवालासह शासनास सादर करण्याची दक्षता घ्यावी.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०१६११५२५९३६२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ajitsingh R Rajput

Digitally signed by Ajitsingh R Rajput
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=TDD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a614ce75be611413980d3efebe7cde81ad571ab119e8360b7b526b5159edd099, serialNumber=32168d31c7d800af039db3657f6a01d233033f3f7c16b7ca135b2c868025eb3e, cn=Ajitsingh R Rajput
Date: 2017.10.16 11:40:38 +05'30'

(अ. रा. राजपूत)
कक्ष अधिकारी

**प्रत,**

१. मा.मंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय,मुंबई
२. मा.राज्यमंत्री आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. स्वीय सहायक,मा. सचिव,आदिवासी विकास,मंत्रालय,मुंबई
४. आयुक्त,आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य,नाशिक.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, नवी मुंबई.
६. सहसचिव,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई.
७. उपसचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व अपर आयुक्त, आदिवासी विकास
९. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
१०. संगणक समन्वयक,आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई
११. निवड नस्ती (का.१९) आदिवासी विकास विभाग,मंत्रालय,मुंबई

**आदिम जमातीचे संरक्षण तथा विकास कार्यक्रम सन २०१४-१५**

**परिशिष्ट-१**

**(रुपये लाखात)**

<table>
<tr><td>१.</td><td>योजनेचे नाव</td><td>ग्रामीण भागातील आदीम जमातीच्या आरोग्य व उत्पन्न वाढ व उपजिविका योजना</td></tr>
<tr><td>२.</td><td>योजनेतील यूनिट व लाभार्थीची संख्या</td><td>'उमेद' अभियानातील इंटेन्सिव्ह/नोंन इंटेन्सिव्ह कार्यप्रणालीमध्ये अंतर्भूत ८ जिल्हयातील लाभार्थी<br>आरोग्य व पोषण :-६४६२ कुटुंब व २१८ गावे<br>उत्पन्न वाढीची योजना :-२९०० कुटुंब व २१८ गावे<br><br>आदिवासी समाविष्ट कुटुंबांच्या विशेष प्रकल्पाअंतर्गत समावेशनाची माहिती :-<br><br>
<table>
<tr><th>अ.क्र</th><th>जिल्हा</th><th>तालुका</th><th>कुटुंब संख्या</th><th>गावांची संख्या</th></tr>
<tr><td>१.</td><td>ठाणे</td><td>शहापूर/ भिवंडी</td><td>६००</td><td>१९</td></tr>
<tr><td>२.</td><td>पालघर</td><td>डहाणू/तलासरी</td><td>६८५</td><td>१९</td></tr>
<tr><td>३.</td><td>रायगड</td><td>कर्जत/पेण/खालापूर/पनवेल/ सुधागड</td><td>२६०</td><td>१९</td></tr>
<tr><td>४.</td><td>नाशिक</td><td>नाशिक/पेठ</td><td>७८</td><td>२</td></tr>
<tr><td>५.</td><td>गडचिरोली</td><td>गडचिरोलो/धानोरा/कोरची/अहेरी/चार्मोशी/मुलचेरा/सिरोंचा/ भामरागड/इटापल्ली</td><td>२२१३</td><td>७५</td></tr>
<tr><td>६.</td><td>यवतमाळ</td><td>राळेगाव/यवतमाळ/कळंब/मारेगाव/बाभूळगाव/केलापूर/घाटजी/ झरीझामणी</td><td>२४२७</td><td>७६</td></tr>
<tr><td>७.</td><td>नांदेड</td><td>किनवट/भोकर</td><td>११८</td><td>५</td></tr>
<tr><td>८.</td><td>चंद्रपूर</td><td>राजुरा/वरोरा</td><td>८१</td><td>३</td></tr>
<tr><td colspan="3">एकूण</td><td>६४६२</td><td>२१८</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>३.</td><td>योजनेचे प्रस्तावित लाभ क्षेत्र</td><td>पालघर, ठाणे, गडचिरोली, यवतमाळ चंद्रपूर, नांदेड, रायगड, नाशिक असे एकूण ८ जिल्ह्यांतील आदिम/आदिवासी जमाती प्रकल्पामध्ये समाविष्ट करण्यात येतील.</td></tr>
<tr><td>४.</td><td>या योजनेत येणारे खर्चाचे अंदाजपत्रक</td><td>
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>उपक्रम प्रशिक्षणे आधारित भर</th><th>कुटुंब संख्या</th><th>दिवस/ महिने</th><th>यूनिट कॉस्ट</th><th>एकूण</th></tr>
<tr><td>१</td><td>आरोग्य/पोषण/ आहारवर प्रशिक्षण</td><td>६४६२</td><td>५ दिवस</td><td>२५०</td><td>८०,७७,५००</td></tr>
<tr><td>२</td><td>१२५ आहार/पोषण सखी/CTC व १२५ कृषी व पशु सखी निवड व प्रशिक्षण</td><td>२५०</td><td>५ दिवस</td><td>४५०</td><td>५,६२,५००</td></tr>
</table></td></tr>
</table>

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | प्रशिक्षण साहित्य (मार्गदर्शक मोडयूल + flip charts) + बॅग + डाइरी + इतर साहित्य | २५० | | ७५० | १,८७,५०० |
| ४ | १२५ आहार/पोषण सखी/CTC व १२५ कृषी व पशु सखी मानधन | २५० | १५ दिवस* २४ महिने | १५० | १,३५,००,००० |
| ५ | पूरक पोषण आहार इ. सुविधा पुरवणे. (पारसबाग/अंडी संकलन/कम्यूनिटी किचन) | ६४६२ | | ४०० | २५,८४,८०० |
| ६ | उत्पन्न वाढीच्या योजना | २९०० | | | १,४५,५०,००० |
| ७ | इतर प्रशासकीय व प्रचार प्रसिद्धी खर्च(तज्ञ व्यक्ती सल्लागार , तांत्रिक साहाय्य संस्था, documentation व इतर प्रसासकीय खर्च) | | | | ५,३७,७०० |
| | **एकूण** | | | | **४,००,००,०००** |

| | | |
|---|---|---|
| ५. | योजना राबवणारी यंत्रणा | 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान |
| ६. | नियंत्रक आधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी - 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान. |
| ७. | योजनेचा उद्देश/हेतू | ➢ महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाची - उमेद ◦ स्थापना ग्रामीण गरीब कुटुंबांचे, उपजीविका वाढवण्यासाठी करण्यांत आली असून त्याकरिता संस्थांची निर्मिती व त्यांना स्वबळावर उभे राहण्यासाठी तयार करणे आहे. याकरिता सामाजिक, आर्थिक समावेशन, सामाजिक सुरक्षेच्या विविध उपाय योजना करणे आहे.<br>➢ महाराष्ट्रातील ग्रामीण आदिवासी/आदीम जमातीतील कुटुबांचे आरोग्य, पोषण/आहार व स्वच्छताबाबत जागृती घडवून मानसिकता बदलणे. कुपोषण कमी करून निरोगी व संपन्न जीवन जगण्यासाठी आदिवासी जमातील कुटुंबे प्रेरित करण्यासाठी विविध उपक्रम राबविणे.<br>➢ आदिम जाती/जमातीच्या कुटुंबासोबत **focus intervention** कार्यप्रणाली निर्धारित करणे. उपजीविकेवर आधारित गट/ग्रामसंघ/प्रभागसंघ यांच्या माध्यमातून कुटुंबांची क्षमता बांधणी करणे. त्याचबरोबर आदिम जमातीच्या **Asset creation** व कौशल्यावर आधारित क्षमता विकसित करणे.<br>➢ 'उमेद' अभियानामार्फत ग्रामीण भागातील जोखीमप्रवण आदिवासी/आदीम जमातीच्या गरीब कुटुंबांना गरीबीच्या चक्रातून बाहेर काढण्यासाठी उत्पन्न वाढ व उपजिविका शाश्वत करण्यासाठी आदिवासी विभागाच्या मदतीने विशेष : उपक्रम |

| | | |
|---|---|---|
| | | हाती घेण्यात येणार आहे.<br>➢ या कुटुंबांच्या उत्पन्नातील लक्षणीय भाग आरोग्य व पोषण व्यवस्थित न झाल्याने आरोग्याच्या खर्चात जातो. उत्पन्न मिळाले तरी आरोग्यामुळे गरीबीमध्ये कुटुंब ओढली जातात. आदिम जमातीच्या महिलांमध्ये अनिमिया व बाल/माता मृत्युचे प्रमाण अधिक आहे. मलेरिया, सिकलसेलचे प्रमाण आदिवासीमंध्ये जास्त असल्यामुळे आरोग्यविषय जागरूकता आणून लक्ष केन्द्रित काम करण्याची आवश्यकता आहे. ०-६ वयोगटांतील मुलांचे कुपोषण ही समस्या तीव्र आहे. या योजनेद्वारे SAM/MAM बालके, किशोरवयीन मुली, गरोदर/स्तनधा माता, वयोवृद्ध यांच्या आरोग्याविषयक जनजागृती पुरवण्याकरीता आदिम जाती/जमातीकरिता भर राहणार आहे. आरोग्य, आहार/पोषण व स्वच्छता याबाबत आदिम जमतीतील कुटुंबामध्ये जागरूकता आली तर विचार व वर्तनात परिवर्तन होण्यास मदत होईल, तसेच या कुटुंबांना आरोग्य सुविधांचा फायदा घेता येईल.<br>➢ या अभियानामार्फत आदीम जाती/जमातीच्या कुटुंबांचा शोध घेऊन त्यांना स्वंयसहाय्यता समूह (SHG's), ग्रामसंघ (Village organisation's) व प्रभागसंघ (Cluster Federation's) मार्फत विविध उपक्रमाद्वारे विशेषत: या कुटुंबाच्या आरोग्य व कुपोषणकरिता कार्यपद्धती निर्धारित करण्यात येईल. अभियानाच्या माध्यमातून सर्वात प्रथम ह्या कुटुंबापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न होईल, त्यांना स्वंयसहाय्यता गटात एकत्र आणल्यानंतर आहार, आरोग्य व पोषण व स्वच्छता या विषयांवर काम होईल.<br>➢ या योजनेतून उपजीविका घटकामधील काम व अनुभव लक्षात घेता, आदिम जाती/जमतीच्या उपजीविका व उत्पन्न वाढीकरिता त्याचा फायदा होणार आहे. शोधलेल्या आदिम जमातीचा प्रथमत: समूह गटांमध्ये (SHG's) समावेश करण्यासाठी जिल्हास्तरावर यंत्रणा कार्यरत आहे त्यामुळे यांचे समावेशन करता येणे शक्य आहे. आर्थिक समावेशन विविध यत्रणांसोबतचा कृतीसंगम (Convergence) च्या आधारे या विशेष प्रकल्पान्वये विशेषत : आदीम जाती/जमातीसाठी उपक्रम घेता येतील. * |
| ९. | योजना अंमलबजावणीची कार्यपद्धती | 'उमेद' अभियान व 'आदिवासी' विभाग या दोन्हीही यंत्रणांचा आदीम जाती व जमातीसोबत काम करून त्यांची गरीबी निर्मूलनाकरीता काम करीत आहे. तसेच आरोग्य/पोषण व स्वच्छता इ. बाबत या कुटुंबापर्यंत शासकीय यंत्रणा व सोयी/सुविधा पोहोचण्याबाबत अडचणी लक्षात घेऊन विशेष कार्यक्रम हाती घेण्याबाबत प्रस्ताव सादर करून त्यावर मान्यता झाल्यास कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील.<br>१. आदीम जाती/जमाती कुटुंब शोध मोहीम व सर्वेक्षण<br>अ. जिल्हापातळीवर 'उमेद' व आदिवासी विभागामार्फत **PO** सोबत बैठका घेऊन कार्यपद्धती निर्धारित केली जाईल.<br>आ. शोध घेतलेल्या कुटुंबांचे सर्वेक्षण केले जाईल.<br>२. जिल्हास्तरीय 'उमेद' स्टाफ, व प्रेरिका प्रशिक्षण घेणे.<br>अ. ज्या जिल्ह्यांमध्ये 'उमेद' मार्फत आदीम जमातीच्या कुटुंबासोबत काम केले |

जाईल. तेथे सर्व जिल्हा यंत्रणेचे कार्यपद्धतीबाबत २ टप्प्यात प्रशिक्षण घेण्यात येईल.

आ. ज्या गावामध्ये कुटुंबाचा शोध घेणे आहे तेथील गावामध्ये कार्यरत असलेल्या किंवा आजूबाजूच्या गावातील प्रेरिकांना सर्वेक्षण करण्यापूर्वी प्रशिक्षण दिले जाईल ज्यामुळे माहितीचे संकलन होईल.

इ. या गावांकरिता त्याच गावामध्ये आहार/पोषण/स्वच्छता इ. कामासाठी पोषण/आहार सखीची निवड करून ५ दिवस प्रशिक्षणातून कार्यपद्धती ठरवून काम व लक्षांक ठरतील. दशसूत्री १००० दिवस पोषण चक्र, आहार प्रात्यक्षिक, विविध विभाग या सोबतचा समन्वयक उमेद उपक्रम गटांसोबत काम आदीम जमातीसोबत कामाची संवेदनशीलता निर्माण केली जाईल.

ई. विविध उपक्रम पंचायत राजसंस्था, **ICDS** व आरोग्य विभागासोबत समन्वय नियोजन करण्यात येईल.

उ. गटात समाविष्ट झालेल्या सर्व कुटुंबाना परसबाग व कुकुटपालन इ. उपक्रम दिले जातील.त्याचा त्यांच्या आहार/पोषणा सोबतच उपजीविका अश्या दोन्ही माध्यमातून उत्पन्न वाढीवर कुटुंबांना सातत्याने मार्गदर्शन देण्यात येईल.

ऊ. आरोग्य/आहार/पोषण व स्वच्छता याकरिता कार्यपद्धती

| **अ. क्र** | **उपक्रम** | **माध्यम** | **जबाबदार व्यक्ती** |
|---|---|---|---|
| १. | Baseline survey व कुटुंबाचा शोध घेणे व समावेशन | सर्वेक्षण फॉर्म | आहार/आरोग्य /कृषी/पशुसखी/ प्रेरिका |
| २. | जाणीव जागृती व entry point activities त्या गावात घेणे. | IEC माध्यम | आहार/आरोग्य सखी/प्रेरिका/ ANM/आशा |
| ३. | गट बांधणे व दशसूत्रीवर गटाच्या माध्यमातून काम | दशसूत्री module | प्रेरिका/आहार सखी |
| ४. | प्रेरिका/ANM/Asha/PRI ग्रामसंघ प्रशिक्षण | Module | प्रेरिका/आहार/ आरोग्य सखी |
| ५. | आहार व पोषणचा कुटुंब निहाय्य आराखडा करणे, follow up ठेवणे, नियोजन करणे | गटचर्चा/PRA Tools चा वापर | प्रेरिका/आहार/ आरोग्य सखी |
| ६. | ग्रामपंचायत/ग्रामसंघ स्तरावर कृतीसंगम नियोजन सादर करणे व ग्रामसभा मान्यता | ग्रामसभा/चर्चा | ग्रामसंघ/पंचायत राज संस्था |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | परसबाग, कृषी विभाग,ICDS समन्वय,पशुसखी ,कृषी सखी | गटचर्चा/IEC/ क्षेत्रभेटी | आहार/पशुसखी/ कृषी सखी |

उमेद मार्फत निवडलेल्या जिल्ह्यातील गाव व कुटुंबांची ओळख/शोध घेण्यासाठी सर्वात प्रथम कार्यपद्धती अवलंबणे आवश्यक ठरते त्याचे टप्पे खालीलप्रमाणे :

१. 'उमेद' व आदिवासी विभागाचे त्या त्या जिल्ह्यांतील PO यांच्या मदतीने निवडलेली गावे/तालुक्यांना क्षेत्रभेटी, ग्रामपंचायत सदस्यांच्या मदतीने कुटुंबाचा शोध घेतला जाईल.

१. आदीम जाती/जमातीच्या कुटुंबांचे सर्वेक्षण फॉर्म भरून त्या सदस्यांची आर्थिक/सामाजिक स्थिती, उपजीविका इ. बाबत माहिती घेण्यात येईल. ज्यामुळे सद्यस्थिती जाणून घेण्यास मदत होईल.
२. ह्या कुटुंबांना सध्या कार्यरत गटात किंवा नवीन गट तयार करून समावेशन करण्यात येईल.
३. गावांमध्ये निवडलेल्या कुटुंबासोबत काम करण्यासाठी वेगळ्या आहार/पोषण/पशु /कृषी,CAM,CLM सखीची प्रशिक्षणानंतर नियुक्ती केली जाईल व त्यांच्यामार्फत या कुटुंबासोबत विविध उपक्रम राबविले जातील. उदा. पारसबाग, कुकुटपालन,बकरी इ.आरोग्य तपासणी, रास्तधान्य, Institutional delivey, ICDS इ.
४. गटांमध्ये दशसूत्रीच्या अंतर्गत ६ वे सूत्र आरोग्य, पोषण व स्वच्छता यावर सखीच्या माध्यमातून उपक्रम घेतले जातील.
५. आदिम जाती/जमातीच्या कुटुंबाचा वेगळा आहार/आरोग्य/स्वच्छता बाबत आराखडा तयार करून त्या कुटुंबातील मुले/महिला यांना 'उमेद' अभियान व शासकीय यंत्रणा ICDS/**PHC**/कृषी योजनाशी सांगड घालून विविध मार्गाने उत्पन्नवाढीचे उपक्रम व आरोग्यांची काळजीबाबत प्रयत्न केले जातील.
६. 'उमेद' अभियानातील फिरता निधी (Revolving Fund), समूह गुंतवणूक निधी (CIF), जोखीम प्रवण निधी (Vulneribility Reduction Fund) चा फायदा गटांपर्यंत देण्यासाठी त्या गटांची गुणवत्ता व क्षमता वाढविली जाईल.
७. १२५ आहार/पोषण सखी व १२५ पशु /कृषी सखी निवड व प्रशिक्षण दिले जातील. त्या कुटुंबासोबत काम करणाऱ्या उपजीविका सखी त्याच कुटुंबासोबत त्यांच्या उत्पन्नवाढीवर काम करतील.
८. आहार/आरोग्य या विषयांची माहिती पोचण्यासाठी मोड्यूल तयार करण्यात येतील.

निवड केलेल्या कुटुंबांचा पाठपुरावा त्या गावातील प्रेरिका व पोषण सखी करतील, पुढे जाऊन उपजीविकेअंर्गत परसबाग, कुक्कटपालन इत्यादी उत्पन्नवाढीचे व पोषणाचे महत्व निवड केलेल्या कुटुंबापर्यंत पोहोचवले जाईल.

| अ. क्र. | उपक्रम | कुटुंबे | विश्लेषण |
|---|---|---|---|
| १. | बकरीपालन | ६०० | १ कुटुंबासाठी १ बकरी व शेड, गावामध्ये सामाजिक (commonshed) याकरीता शासकीय यंत्रणासोबत समन्वय व MGNREGA अंतर्गत शेड बांधकाम प्रोत्साहन देणे. प्रत्येक गावामध्ये पशुसखीच्या माध्यमातून सुविधा पुरवण्यात येईल व मार्केटिंगसाठी विविध संस्था/यंत्रणासोबत काम केले जाईल. |
| २. | कोंबडीपालन | ८०० | प्रती कुटुंबांसाठी ३० पिल्ले व backyard शेड तयार करण्यांचे प्रशिक्षण पशुसखीमार्फत भेटी/खाद्य/मार्केटिंग सुविधा व mother unit तयार करण्यासाठी infrastructure तयार करण्यात येईल. |
| ३. | शाश्वत शेती | १५०० | पारंपारीक शेती व तत्सम उपक्रमांमध्ये मुल्यवर्धन करून उत्पन्न वाढीकरीता प्रयत्न करणे |
| ४. | शेती आधारीत जोडधंदे, व्यवसाय | | शेती/बिगर शेती व्यवसायाकरिता मार्गदर्शन/प्रशिक्षण व साहित्य/कौशल्य पुरवणे.<br>जंगलातील नैसर्गिक साधन संपत्तीवर आधारित NTFP ना market linkages व समन्वय |
| ५ | Common infrastructure | १० | मदर युनिट/ हॅचरी सेंर्टस व गौण वनोपज गोळा करणे व त्यांची साठवणूक ,शेती आधारित पायाभूत सुविधा तयार करून त्यावर इतर प्रकीया करण्याकरीता Common infrastructure उपलब्ध करणे इ. |

| | | |
|---|---|---|
| १०. | योजनेचे सनियंत्रण व मूल्यमापन | **उमेद मार्फत कामाचे मूल्यमापन व सनियंत्रण करिता आराखडा तयार त्यासाठी MIS मध्ये त्याचे मोजमाप करण्यात येईल.**<br>१. MPR – Monthly Progress Report/AAP-Annual Action Plan by CEO MSRLM-UMED.<br>२. Review meetings – Monthly/Quately/Half yearly/Yearly by Commissioner, Tribal Development, Nashik<br>३. Process Monitoring |
| ११. | योजनेची मंजुरी अंमलबजावणीचा कालावधी | योजनेचा मंजुरी अंमलबाजवणी कालावधी २ वर्ष (२०१७-१९) |
| १२. | योजनेच्या अटी व शर्ती | MSRLM - 'उमेद' द्वारे कामाची कार्यपद्धती ठरलेली असल्यामुळे खालील अटी शर्तीच्या अर्थात राहून ठरवलेले उपक्रम वर्ष २०१६-१७ च्या अखेरपर्यन्त निधि प्राप्त झालेल्या दिवसापासून २ वर्षाचा उपक्रम राबविण्यात येतील. |

| | | |
|---|---|---|
| | | १. निवडलेल्या जिल्ह्यांतील तालुक्यांमध्ये ठरवलेले उपक्रम हे २ वर्षाच्या कलावधीत MSRLM राबविल.<br>२. निवडलेल्या जिल्ह्यांमध्ये ठरलेल्या उपक्रम व्यवस्थित राबविले जावेत. याकरिता 'उमेद' व आदिवासी विभागांची एकत्रित जबाबदारी राहील. प्रत्येक उपक्रमाचे अंतर्गत output, timeline व अपेक्षित फलश्रुति व त्याचा निधि याबाबतची स्पष्टता मार्गदर्शिकेद्वारे जिल्हयांनी देण्यात येईल व त्यानुसार जिल्हे उपक्रम राबवतील.<br>३. या उपक्रमामुळे तयार झालेल्या प्रेरिका आहार व पोषणसखी विविध प्रकारच्या वस्ती कार्यकर्त्या पुढे जाऊन प्रभागसंघ, ग्रामसंघाचा भाग राहतील व त्यांचे मानधन तयार झालेल्या संस्था भागवतील.<br>४. 'उमेद' अभियानात काम करणारी जिल्हा, तालुका यंत्रणा उपक्रम राबविण्यास बांधील राहील. व त्यामध्ये अपेक्षित strategies activities, report, case studies तयार करून त्यांचे त्रैमासिक, सहामाही, वार्षिक फलश्रुति आदिवासी विभागाला सादर करेल. 'उमेद' अभियानांची जिल्हा तालुका यंत्रणा अंमलबजवणी करेल. प्रभागस्तरावरील प्रभागसमन्वयक हे प्रेरिकांच्या मदतीने उपक्रम राबवतील. याकरिता स्टाफची कार्यशाळा प्रशिक्षणे exposure visit होईल.<br>५. प्रकल्पाला मान्यता मिळालेल्या निधीच्या अधिन राहून उपक्रमांवर खर्च केला जाईल. व त्याप्रमाणे खर्च साध्य अहवाल व पूर्णत्व प्रमाणपत्र 'उमेद' तर्फे आदिवासी विभागास सादर केले जाईल.<br>६. उपक्रमांची अंमलबाजवणी करताना व योजना पूर्ण झाल्यावर चांगल्या प्रतिची चित्रफिती छायाचित्रे, फलनिष्पती अहवाल Umed/TDD यांनी त्यांचे स्तरावर जतन करावा व यशोगाथा प्रसिद्ध करावा<br>७. ज्या जिल्ह्यांत व तालुक्यांत उपक्रम राबवले जाईल तेथे आदिवासी विकास विभागाकडील आदिम जमातीचे संरक्षण तथा विकास कार्यक्रमांतर्गत अश्या आशयाचे फलक लावण्यास येतील सर्व knowldege product तयार करतांना आदिवासी विभागास माहिती देऊन तयार करेल.<br>८. सदर उपक्रमांसाठी निवडलेले तालुके, गाव, वाड्या, वस्त्या न मिळाल्यास लक्षांकात बदल करणे/ योजेनेचे कार्यपद्धतीमध्ये बदल करण्याचा अधिकार आदिवासी विभागास राहील.<br>९. योजनेचा कालावधी २ वर्षाचा राहील<br>१०. आयुक्त आदिवासी विभाग व 'उमेद' मुख्य कार्यकारी अधिकारी हे योजनेचा त्रैमासिक सहमाहि व वार्षिक आढावा घेतील व 'उमेद' त्यांचे संकलित अहवाल आयुक्तालयास सादर करतील. |

<table>
<tr><td>१३.</td><td>योजनेची फलनिष्पती</td><td>वरील उपक्रमाच्या आधारे खालील सूचकांवर आधारित फलनिष्पती

<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>क्षेत्र</th><th>अपेक्षित सुचके</th><th>सद्यस्थिती</th><th>अंतिम स्थिती (दोन वर्षानंतर)</th><th>अपेक्षित साध्य</th></tr>
<tr><td>१.</td><td>पोषण</td><td>कुपोषण मुक्त बालाकांची संख्या</td><td></td><td></td><td>८०%</td></tr>
<tr><td></td><td></td><td>रक्तक्षय वाढलेल्या मातांची संख्या</td><td></td><td></td><td>८०%</td></tr>
<tr><td>२.</td><td>आरोग्य</td><td>पूर्ण लसीकरण केलेली बाळे</td><td></td><td></td><td>९०%</td></tr>
<tr><td></td><td></td><td>रुग्णालयात बाळतपण होणाऱ्या महिला</td><td></td><td></td><td>८०%</td></tr>
<tr><td></td><td></td><td>आयर्नच्या गोळ्याचे सेवनकरणाऱ्या महिला</td><td></td><td></td><td>८०%</td></tr>
<tr><td>३.</td><td>स्वच्छता</td><td>घरात शौचालय बांधून वापरणारे कुटुंब</td><td></td><td></td><td>५०%</td></tr>
<tr><td>४.</td><td>उत्पन्न वाढ</td><td>उत्पन्नवाढीच्या योजनांचा लाभ मिळणाऱ्या लाभार्थ्यांच्या वार्षिक उत्पन्नामध्ये होणारी वाढ</td><td></td><td></td><td>३०-४०%</td></tr>
</table>
</td></tr>
</table>